स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प.),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल :** vasaivirarcorporation@yahoo.com

**दिनांक : 23/08/2025**

वसई-विरार शहर महानगरपालिका
निवडणूक विभाग

वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -2025 करिता प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध , हरकती व सूचना सादर करणेसाठी 04 सप्टेंबर 2025 ही अंतीम तारीख

मा.राज्य निवडणूक आयोग यांनी दिलेल्या आदेशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -2025 करिता प्रभाग निहाय प्रारूप प्रभाग रचना दि. 22 ऑगस्ट, 2025 रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदरची प्रभाग निहाय प्रारूप प्रभाग रचना महानगरपालिका मुख्य कार्यालय, महानगरपालीकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये (प्रभाग - ए, बी, सी, डी, ई, एच, जी, एच, आय) तसेच महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रारूप प्रभाग रचनेवर कोणत्याही हरकती व सूचना असल्यास दि. 22 ऑगस्ट, 2025 ते दि.04 सप्टेंबर, 2025 (दुपारी 3.00 वाजेपर्यंत) या कालावधीत कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळुन) वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे निवडणूक कार्यालय अथवा संबंधित प्रभाग समिती (प्रभाग - ए, बी, सी, डी, ई, एच, जी, एच, आय) कार्यालयांत सादर कराव्यात. प्राप्त हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना घेतलेल्या हरकतींवर सुनावणी करिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

प्रभाग निहाय प्रारूप प्रभाग रचना खालील ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

1) वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, नवीन इमारत, यशवंत नगर रोड, विरार (प.)
2) प्रभाग समिती कार्यालय ‘ए’ बोळींज
3) प्रभाग समिती कार्यालय ‘बी’ विरार (पूर्व)
4) प्रभाग समिती कार्यालय ‘सी’ चंदनसार
5) प्रभाग समिती कार्यालय ‘डी’ आचोळे
6) प्रभाग समिती कार्यालय ‘ई’ नालासोपारा
7) प्रभाग समिती कार्यालय ‘एफ’ धानीव-पेल्हार
8) प्रभाग समिती कार्यालय ‘जी’ वालीव
9) प्रभाग समिती कार्यालय ‘एच’ नवघर-माणिकपूर
10) प्रभाग समिती ‘आय’ वसई गाव

तसेच महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.